सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

# शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक

पहिला मजला, मनपा इमारत, जवाहर मार्केट, नाशिक रोड, ता. जि. नाशिक ४२२१०१

दूरध्वनी क्रमांक: - ०२५३-२४६५६८२ ई मेल- gdlnashik.dol@maharashtra.gov.in

जा.क्र. शाविग्रंना/रद्दी विक्री/२०२६-२७/१९९ दिनांक: - १५/०६/२०२६

**वृत्तपत्र व नियतकालिके यांची रद्दी खरेदी करणाऱ्या एजन्सीकडून दरपत्रक मागविणेबाबत...**

शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक, ता. जि. नाशिक या शासकीय ग्रंथालयामध्ये वाचकांसाठी येणारी व कालबाह्य झालेली वृत्तपत्रे व नियतकालिके यांची रद्दी विक्री करावयाची आहे. सदर रद्दी सध्या जेथे आहे, जशी आहे तशी व आहे त्या स्थीतीमध्ये विक्री करावयाची आहे. नोंदणीकृत रद्दी खरेदी करणाऱ्या एजन्सीने खालील अटी व शर्तीचे अधीन राहून, अधिकतम दराने रद्दी खरेदी करण्यास तयार असणाऱ्या नोंदणीकृत **परवानाधारक** एजन्सीकडून **दिनांक १६/०६/२०२६ सकाळी ११.०० ते दिनांक ३०/०६/२०२६ सायंकाळी ५.००** या वेळेत (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयास मोहोरबंद लिफाफ्यामध्ये दरपत्रक सादर करावे.

**अटी व शर्ती-**

१) मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील जुनी वर्तमान पत्रे व नियतकालिके यांची रद्दी खरेदीचा प्रति किलो प्रमाणे दर नमूद करावा.

२) रद्दी खरेदीचे दर नमूद करतांना कोणत्याही खर्चाचा / कराचा / दरांचा समावेश नसावा.

३) रद्दी मोजण्यासाठी एजन्सीकडून आणणेत येणारा इलेक्ट्रॉनिक वजन काटा वैध मापन कार्यालयाने प्रमाणित केलेला **व परवाना दिलेला** असावा. त्याचे वेगळे चार्जेस अदा केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. इलेक्ट्रॉनिक वजन काटा सदोष आढळल्यास अशा एजन्सी**चा विचार होणार नाही. त्या एजन्सीला** काळ्या यादीत टाकण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) कार्यालयाकडून प्राप्त दरपत्रकांची तपासणी करुन अधिकतम दराने रद्दी खरेदी करण्यास तयार असलेल्या एजन्सीला रद्दी मोजून घेण्यासाठी ठराविक कालावधी देण्यात येईल. सदर एजन्सीला दिलेल्या कालावधीमध्ये रद्दी घेऊन जाण्याची व्यवस्था करावी लागेल. हमाली खर्च, गाडी भाडे व इतर अनुषंगिक खर्च संबंधित एजन्सीलाच करावा लागेल.

५) ज्या एजन्सीचे दर अधिकचे असतील अशा एजन्सीलाच रद्दी खरेदीसाठी पत्रव्यवहार करण्यात येईल. त्यासाठी त्यांना कार्यालयाकडून विहीत दिनांक व वेळ देण्यात येईल. त्या एजन्सीने अनामत रक्कम रु.१०,०००/- रोखीने कार्यालयात जमा करावी.

६) रद्दी मोजणी करुन घेऊन जातांना अनामत रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम त्याच दिवशी रोखीने कार्यालयास भरणा करावी. **रद्दी विक्रीची रक्कम कार्यालयामध्ये पूर्ण भरणा केल्याशिवाय** रद्दी घेऊन जाण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

७) रद्दी खरेदी करण्यासाठीचे दरपत्रकाचा नमूना खालील प्रमाणे असेल.

| अ.क्र. | भाषा | प्रति किलो दर (वर्तमानपत्र) | प्रति किलो दर (नियतकालिके) |
|---|---|---|---|
| १) | मराठी | | |
| २) | हिंदी | | |
| ३) | इंग्रजी | | |

८) उपरोक्त अटी मान्य असल्यास, रद्दी खरेदी करण्यास तयार असलेल्या एजन्सीजने विहीत मुदतीत त्यांची दरपत्रके मोहोरबंद लिफाफ्यामध्ये कार्यालयास सादर करावे. लिफाफ्यावर "रद्दी खरेदी करणेसाठी दरपत्रक" असा स्पष्ट उल्लेख केलेला असावा. तसेच, ज्या लिफाफ्यामध्ये एजन्सीचे दरपत्रक टाकण्यात येणार आहे, त्या लिफाफ्यावर एजन्सीचे संपूर्ण नाव, पत्ता व संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करण्यात यावा. एजन्सीकडे नोंदणीकृत रद्दी खरेदी करण्याचा परवाना असल्याची वैध सुस्पष्ट प्रत दरपत्रकासोबत जोडण्यात यावी.

९) रद्दी खरेदी करणाऱ्या एजन्सीने नमूद केलेले महत्तम दरांमध्ये समानता आल्यास स्थानिक एजन्सीजचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

१०) अपूर्ण भरलेले, मोहोरबंद लिफाफा नसलेले व विहीत नमून्यात दरपत्रक नमूद नसलेले दरपत्रक रद्द समजण्यात येतील, याची रद्दी खरेदीसाठी इच्छूक एजन्सीजने नोंद घ्यावी. केवळ दरपत्रक कार्यालयास सादर केले म्हणून रद्दी विक्रीसाठी एजन्सी पात्र झाली असे समजण्यात येऊ नये.

११) दरपत्रक स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्दी विक्रीची प्रक्रीया रद्द करणेचे अधिकार कार्यालय प्रमुखांकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**स्थळ:- नाशिक**
**दिनांक:- १५/०६/२०२६**

(अविनाश द. येवले)
जिल्हा ग्रंथालय अधिकारी,
शासकीय विभागीय ग्रंथालय, नाशिक